9 शिवस्मृती, 51 जयप्रकाश नगर,
गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063.
दूरध्वनी : 022-26863339
फॅक्स : 022-26861133
ई-मेल : vishakha@ramnaik.com

**राम नाईक**
**यांचे जनसंपर्क कार्यालय**

31 डिसेंबर 2012

सप्रेम नमस्कार,

माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांच्याबद्दल आपल्या मनात असलेल्या स्नेहामुळे आवर्जून ही पुस्तिका पाठवित आहे.

श्री. राम नाईक यांच्या राजकीय, सामाजिक कारकीर्दिशी आपला परिचय आहेच. तरीही अनेकांना ते घडले कसे, 1994 मध्ये त्यांनी कर्करोगावर केलेली मात, राजकारणाबाहेरचे रामभाऊ याबद्दल खूप कुतुहल आहे. नुकत्याच झालेल्या दिवाळीत दोन दिवाळी अंकांमध्ये प्रसिद्ध झालेले लेख ही जिज्ञासा काही अंशी पूर्ण करणारे आहेत. 'ग्राहकहित'च्या दिवाळी अंकात संपादकांच्या आग्रहानुसार रामभाऊंनीच 'माझी वाटचाल' या लेखामध्ये हा आपल्या जीवनाचा थोडक्यात आढावा घेतलाय, तर 'डोंबिवलीकर'च्या दिवाळी अंकात श्री. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी 'श्रीमंती साधेपणाची' हा विशेष लेख रामभाऊंवर लिहिलाय. हे दोन लेख या पुस्तिकेत पुन: प्रकाशित केले आहेत.

दिवाळी नंतरच्या कालावधीत दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. कुष्ठरुग्णांच्या समस्या सोडविण्यात श्री. राम नाईक विशेष रस घेतात, देशभरातील कुष्ठरुग्णांसाठी काम करणा-या विविध संघटनांना एकत्र करुन कुष्ठरुग्णांच्या सशक्तिकरणासाठी त्यांनी राज्यसभेकडे केलेला विनंती अर्ज, त्याचा पाठपुरावा सर्वांच्या परिचयाचा आहे. कुष्ठरुग्णांना श्री. राम नाईकांचे पाठबळ सतत लाभावे यासाठी जागतिक कीर्तिच्या 'इंटरनॅशनल लेप्रसी युनियन' या संस्थेने 23 नोव्हेंबर रोजी आपल्या अध्यक्षपदी त्यांची बिनविरोध निवड केली आहे.

गीत रामायणाचे रचनाकार, मराठीचे वाल्मिकी म्हणून मानले जाणारे प्रसिद्ध साहित्यिक कै. ग.दि.माडगूळकर (गदिमा) यांच्या स्मृत्यर्थ गदिमा प्रतिष्ठानानेही 14 डिसेंबर रोजी 'गदिमा स्नेहबंध' पुरस्काराने रामभाऊंना सन्मानित केले आहे. रामभाऊ आणि गदिमा यांच्या या स्नेहबंधाचा धावता उल्लेखही या लेखांत आहे.

या पुस्तिकेबद्दलच्या आपल्या प्रतिक्रिया अवश्य कळवाव्यात, ही विनंती.

नव्या वर्षासाठी हार्दीक शुभेच्छा.

आपली,

(विशाखा कुलकर्णी)

विशेष : पुस्तिका वेबसाईट www.ramnaik.com वर उपलब्ध आहे.